# ※ महाराष्ट्राचा पोवाडा ※

(ले: विद्वान शाहीर प्रभाकर जामखेडकर, मुंबई ४०० ०५१)

•—०—•

पोवाडा महाराष्ट्राचा। महान राष्ट्राचा। राष्ट्रधर्माचा।
भारताची ऊंच राखिली मान। आम्हासी सार्थ त्याचा अभिमान।
'प्रभाकर' गाई त्याचे यशगान॥ धृ.॥
आधी नमितो भारतमाते। संतमहंताते। शूरवीराते।
तन, मन, धन त्यागिले जाण। हाती घेऊनी सत्तीचे वाण।
स्वातंत्र्यासाठी अर्पिले प्राण॥
महाराष्ट्र संतांची खाण। थोर शिकवण। समाज धुरिण।
ज्ञानदेव, संत तुकाराम। रामदास तसे नामदेव। नष्ट केले सारे भेदभाव

चाल :— मातेच्या कंठी हार। हारात मणी भरदार॥
पंजाब, सिंध, गुजरात। अन् द्राविड, उत्कल, वंग॥
त्यातील 'मराठा' एक। मणी करी सुशोभित अंग॥
इतिहास महाराष्ट्राचा। शौर्याच्या शाईत लिहिला॥
या हौतात्म्यातून फुलला। नव अंकुर स्वातंत्र्याचा॥

चाल :— मर्द मराठ्यांनी जयघोष केला त्तकाला॥
'हर हर महादेव' गर्जता धडकी शत्रूला॥
तळहाती शीर घेऊनी लढे मावळा॥
दख्खन देशी मर्द मावळ्यांचा दरारा भला॥
सामान्यांच्या मनामधी स्वाभिमान फुलविला॥
परसत्ता भस्मसात करी क्रांतीची ज्वाला॥

चाल :— शिवाजीने इतिहास घडविला, स्वराज्य घालूनी जन्मास।
कालचक्र फिरविले देऊनी, कणखर शासन देशास॥
जात पात ना, धर्म सारखे, उचीत आदर महिलास।
लोकशाहीची बीजे पेरली, शिवशाहीने देशात॥

चाल : उखडण्या इंग्रजी सत्ता देशातून ---

१ पुढे चालू.

जामखेडकर

चाल: उखडण्या इंग्रजी सत्ता देशातून।
आद्य क्रांतिवीर गर्जले दंड ठोकून।
महाराष्ट्र सदोदित देई स्वतः झोकून।
अन्यायाची आम्हासी चीड। चीड, तशी नाही भिडभाड।
भिडभाड, हो वागणूक सदा निर्भीड॥

चाल: लाभले महात्मा फुले। आंबेडकर भले। स्वत्त्व जागले।
अस्मितेचा केला भुभुःकार। समाजक्रांतिचे शिल्पकार।
महाराष्ट्राचे पुत्र थोर॥

चाल: रणावीण स्वातंत्र्य मिळविले, सत्य अहिंसा शस्त्रांनी।
अग्रेसर महाराष्ट्र त्यातही, स्वातंत्र्याचे सेनानी॥
'स्वतंत्र' वायुवरी फडकतो, तिरंगी झेंडा डौलाने।
स्वातंत्र्याचे श्वास घेताची, ऊर भरे अभिमानाने॥

चाल:- महाराष्ट्र मारी आघाडी। प्रगतीची उडी। घेतली बडी।
भारतात अग्रक्रम ज्याचा। गरीब, शेतकरी, मजूरांचा।
कळवळा दलित बांधवांचा॥

चाल:- असू आम्ही भारतीय आधी — हा खास मराठी बाणा॥
असू आम्ही भारतीय एक — एकताच आमुचा बाणा॥
या भारतमाते पुढती — स्वर्गही गौण तुम्ही जाणा॥

चाल:- हिमालय संकटी पडे। सह्याद्रिच्या छातिचे कडे।
संकटांना घालिती वेढे। शिवाजीचा पराक्रमी वारसा चालला पुढे॥

चाल:- आता गाऊ पवाडे महाराष्ट्र धर्माचे॥
वाजवू तुणतुणे फक्त राष्ट्रधर्माचे॥
एकतेचे टाळ वाजवू भ्रातृधर्माचे॥
समतेच्या डफावर गान सर्व धर्मांचे॥

२ पुढे चालू

मिळवणी :- धन्य धन्य मराठी देश । नवा उन्मेष । आत्मविश्वास ।
गाऊ आता हेच राष्ट्रगीत । देशावर आमची खरी प्रीत ।
लोकशाहीची करू जीत ॥

---

पोवाडा महाराष्ट्राचा । महान् देशाचा । राष्ट्र धर्माचा ।
भारताची ऊंच राखिली मान । आम्हासी सार्थ त्याचा अभिमान ।
'प्रभाकर' गाई त्याचे यशगान ॥धृ.॥

मुंबई ४०० ०५१
दि. २३.४.१९८९

(सही)
(प्रभाकर जामटकर)